## निशाणी क्र. २९ खालील आदेश

**१.** प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी प्रस्तूतचा अर्ज त्यांचे विरूद्ध झालेला ''कैफियत -म्हणणे नाही '' आदेश रद्द होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

**२.** अर्जातील प्रतिवादी क्र. १ व ४ च्या कथनानुसार, लॉकडाउनमुळे प्रतिवादी यांना मुदतीमध्ये आपले म्हणणे कैफियत देण्याकरिता आवश्यक असणारे कागदपत्रे काढता आलेले नाहीत. त्यामुळे कैफियत दाखल करणेस विलंब झाल्याचे नमूद केलेले आहे. पुढे अर्जातील प्रतिवादींचे कथनानुसार प्रतिवादींनी मुद्दामहून अथवा हेतुपुरस्पर विलंब केलेला नसून प्रतिवादी यांना कैफियत देवून बचाव मांडण्याची संधी देणे गरजेचे असल्याने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केलेली आहे.

**३.** प्रस्तूतच्या अर्जास वादीने आपले म्हणणे दाखल केले असून वादीचे म्हणन्यानुसार, प्रतिवादी यांनी दिलेला अर्ज खोटया मजकुराचा असून, प्रतिवादी यांनी जानुनबूजून वेळेत कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादी यांना योग्य तो दंड आकारून कैफियत स्विकारण्यास हरकत नाही, अशी विनंती केलेली आहे.

**४.** प्रतिवादीचा अर्ज व त्यावरील वादीने दिलेले म्हणणे वाचले. वादी-प्रतिवादी वकीलांचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तूतचा दावा प्रतिवादी विरूद्ध अतिक्रमणीत क्षेत्राचा ताबा काढुन मिळणेस, तसेच मेन्डेटरी ताकीद व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र. १ व ४ यांच्यावर दिनांक ०३.११.२०२० रोजी दावा नोटीसीची बजावणी होवुनही प्रतिवादी यांनी आपले म्हणणे कैफियत दाखल न केल्याने दिनांक ०५/०२/२०२१ रोजी कैफियत नाही असा आदेश पारित केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी योग्य त्या कायदेशीर मुदती नंतर सुमारे काही दिवसांचे विलंबानंतर प्रतिवादींनी सदरचा अर्ज दाखल केलेला असून अर्जात नमूद केलेले कारण कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत नाही. परंतु, प्रतिवादी क्र. १ व ४ ची कैफियत दाव्याच्या कामी सामील करून न घेतल्यास दाव्यातील गुंतागुंत निश्चितच वाढणार आहे व दावा सर्व बाजूंचा न्यायीक विचार करून निर्गत करणे अडचणीचे होणार आहे. याउलट प्रतिवादी क्र. १ व ४ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास

दाव्यातील वादाचे निश्चित स्वरूप न्यायालयासमोर येवून दाव्यातील वाद निर्गत करणेस मदत होणार आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १ व ४ यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणेस नैसर्गिक न्यायतत्वानुसार गरजेचे असल्याने प्रतिवादीं क्र. १ व ४ चा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादी क्र. १ व ४ यांना आपले म्हणने कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत योग्य तो दंड आकारून अर्ज निर्गत करणे आवश्यक असल्याचे निर्णयाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**-: <u>आदेश</u> :-**

**१.** प्रतिवादी क्र. १ व ४ चा प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी क्र. १ व ४ विरूद्ध ''कैफियत-म्हणणे नाही'' असा आदेश प्रत्येकी रक्कम रू. १००/- चा दंड वादींना देण्याच्या अटीवर रद्द करणेत येतो. प्रतिवादी यांनी दिलेली कैफियत, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्या नंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

**सही/-**

दिनांक : १७/०२/२०२१.

पी. व्ही. सपकाळ
दिवाणी न्यायाधीश, जामखेड.